"आरोग्याच्या
सुपर स्पेशालिटी सेवा
एकाच छताखाली"

# वृत्तपत्रिका
जानेवारी २०२४

मराठवाडा मेडिकल ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट

# कमलनयन बजाज हॉस्पिटल




मराठवाड्यातील एक विश्वसनीय रूग्णालय | अद्ययावत सुविधा व वैद्यकिय उपकरणांनी सुसज्ज | अनुभवी व निष्णात डॉक्टर्स
सर्व समावेशक सुविधा एकाच छताखाली असणारे रूग्णालय | मुत्रपिंड, यकृत आणि हृदय प्रत्यारोपण साठी मान्यता प्राप्त रूग्णालय

# एक आयुष्य वाचवु (Save a Life) -
# CPR Awareness Programme (कमलनयन बजाज हॉस्पिटल)

6th December 2023








कमलनयन बजाज- एक आयुष्य वाचवु (Save a Life) :
ह्या कार्यक्रम अंतर्गत कमलनयन बजाज हॉस्पिटल येथील कर्मचारी व डॉक्टर यांना हृदयाचे कार्य नुकतेच थांबलेल्या रुग्णांना जीवदान देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले



# स्तनाचा कर्करोग समर्थन गट

(Breast Cancer Support Group)- कमलनयन बजाज हॉस्पिटल

8th December 2023





















स्तनाच्या कर्करोगाविषयी जनसामान्या मध्ये जनजागृती करण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे "स्तनाचा कर्करोग समर्थन गट" तयार करण्यात आला.

ह्या गटाची मासिक बैठक दर महिन्याला घेण्याचे ठरले आहे.





## एक आयुष्य वाचवु (Save a Life )- CIE Aluminum Casting Ltd.

9th December 2023








हृदयाचे कार्य नुकतेच थांबलेल्या रुग्णांना जीवदान देण्याचे प्रशिक्षण "कमलनयन बजाज" - एक आयुष्य वाचवू" ह्या कार्यक्रमा अंतर्गत CIE Aluminum Casting Ltd. येथील कर्मचाऱ्यांना देण्यात आले

## व्याख्यान-महिलांचे आजार व त्या विषयी माहिती- बजाज ऑटो लि.

12th December 2023







**बजाज ऑटो लि.** येथे डॉ. वेदत्रयीं देशमुख (स्त्री रोग तज्ञ) यांनी महिला कर्मचारी यांना विविध महिलांचे आजार व त्या संबधी काय काळजी घेतली पाहिजेत याविषयी मार्गदर्शन केले.

## एक आयुष्य वाचवू (Save a Life) - नाथ बायो - जीन्स, पैठण

16th December 2023







हृदयाचे कार्य नुकतेच थांबलेल्या रुग्णांना जीवदान देण्याचे प्रशिक्षण "कमलनयन बजाज - एक आयुष्य वाचवू" ह्या कार्यक्रमा अंतर्गत नाथ बायो - जीन्स, पैठण येथील कर्मचाऱ्यांना देण्यात आले.

## एक आयुष्य वाचवू (Save a Life) - रिव्हरडेल हायस्कूल

20th December 2023








हृदयाचे कार्य नुकतेच थांबलेल्या रुग्णांना जीवदान देण्याचे प्रशिक्षण "कमलनयन बजाज - एक आयुष्य वाचवू" ह्या कार्यक्रमा अंतर्गत रिव्हरडेल हायस्कूल येथील विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना देण्यात आले.

# PFAC - रुग्ण व नातेवाईक समुपदेशन / संवाद बैठक- ”

22nd December 2023








सांधे प्रत्यारोपण व अस्थिरोग आणि त्या संबंधित आजारांवर मात केलेल्या काही रुग्णांनी केलेले आत्मकथन “कमलनयन बजाज रुग्णालयातील अनुभव कथन” या विषयी एक बैठक आयोजित करण्यात आली. सदरहू रुग्णांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला.

## सहभागी तज्ञ :

**डॉ सुबोध सोळंके -**
अस्थीरोग व सांधे प्रत्यारोपण तज्ञ

**डॉ मिलिंद वैष्णव -**
फिजिशियन व मेडिकल डायरेक्टर

## प्रमुख पाहुणे :

**डॉ जॉर्ज फर्नांडिस-**
मुख्य कार्यकारी अधिकारी



## कमलनयन बजाज हॉस्पिटल,
## स्पाईन सुपर स्पेशालिटी विभाग



**डॉ . अनुज भारुका**
मणके विशेष तज्ञ

## आजच्या काळात तरुणांमध्ये मणक्याच्या समस्यांचे वाढते प्रमाण !!!

मानवी शरीरात पाठीचा कणा ही मुख्य रचना आहे व त्यामुळे मानवी शरीरात लवचिकता राहते.आजच्या काळात व्यायामाचे अभाव, खराब जीवनशैली यामुळे मणक्याचे विकार उद्भवतात, जसे की डिस्क प्रोलॅप्स, स्पाइनल कॅनल स्टीनोसिस व कमरे संबंधीच्या स्पॉंडिलायसिस. यात विशेष काळजी व वैद्यकीय सल्ला योग्य वेळी घेणे अतिशय आवश्यक आहे.

कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथील स्पाईन सुपर स्पेशालिटी विभागात प्रगत निदान व अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध आहेत. मणक्यांशी संबंधित समस्यांच्या संपूर्ण श्रेणीचे व्यवस्थापनाचा मणके विशेषज्ञ डॉ. अनुज भारुका यांना आठ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. पाठीच्या उपचारांसाठी व मणक्यांच्या संबंधित समस्यांना लागणारी मायक्रोस्कोपिक व मिनीमली इन्वेसिव्ह स्पाईन सर्जरीत त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहेत. आतापर्यंत त्यांनी हजारो रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार केले आहे.

**मणक्यांच्या आजारासंबंधित गैरसमजाबाबत**
**डॉ अनुज भारुका यांचे मत..**

### गैरसमज # 1

**वृद्धापकाळातच मणक्यांच्या समस्या उद्भवतात का..?**
आज कालच्या जीवनशैलीचे बदल लक्षात घेता मणक्यांच्या समस्यांमध्ये लक्षणीय वाढ जास्त करून तरुण वयोगटातील रुग्णांमध्ये दिसून येते. दीर्घकाळ एकाच ठिकाणी बसून राहणे, बसण्याची चुकीची पद्धत व लठ्ठपणा मुळे सर्वात जास्त तरुणांमध्ये मणक्या संबंधित समस्या वाढत आहे. सकस आहाराची कमतरता व व्यायामाच्या अभावामुळे या समस्या दिवसेंदिवस तरुणांमध्ये जास्त प्रमाणात वाढत आहेत.

### गैरसमज #2

**प्रत्येक मणक्याच्या आजाराला ऑपरेशनची गरज असते का..?**
मणक्याच्या आजाराचे योग्य वेळी निदान व त्यावर आवश्यक उपचार केल्यास 90% रुग्णांना ऑपरेशनची गरज पडत नाही. त्यात डॉक्टरचे मार्गदर्शन जसे की काही दिवसांसाठी आराम करणे, दुखणे कमी झाल्यास व्यायाम करणे, काम करण्याची व बसण्याची पद्धत, वजनावरील नियंत्रण, औषधोपचार व गरज पडल्यास पेन मॅनेजमेंट प्रोसिजर वगैरे मुळे जास्तीत जास्त प्रमाणात ऑपरेशन टाळता येते.

### गैरसमज # 3

**मणक्यांच्या शस्त्रक्रियेचे दुष्परिणाम व पूर्णपणे बरे होण्यास जास्त कालावधी लागतो का..?**
मणक्यांची शस्त्रक्रिया केल्यास दीर्घकाळापर्यंत अंथरुणावरच विश्रांती घ्यावी लागते किंवा त्यामुळे अर्धांगवायू होतो हे सर्वात प्रचलित गैरसमज आहे. प्रगत तंत्रज्ञान व प्रगती कौशल्यामुळे मणक्यांच्या शस्त्रक्रिया मागील 10 वर्षात खूप मोठ्या प्रमाणात सुरक्षित व परिपूर्ण होत आहेत. कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये मागील काही वर्षांपासून अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तज्ज्ञांच्या देखरेखी खाली विशेष टीम कुशलतेने सुरक्षित व यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडत आहेत. दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया केल्याने लहान चिरा, कमीत कमी रक्तस्त्राव व बरे होण्यास लागणारा कमी वेळ यामुळे अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेत बऱ्याच प्रमाणात वाढ झाली आहे. प्रगत तंत्रज्ञानामुळे कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे सर्व प्रकारच्या मणक्यांच्या शस्त्रक्रियेनंतर पेशंट लवकरच बरा होऊन 24 तासातच चालायला लागू शकतो व तीन दिवसात सुट्टी होऊन तो घरी जाऊ शकतो.

### गैरसमज #4

**वृद्धापकाळात मणक्याची शस्त्रक्रिया करता येत नाही का..?**
वृद्धापकाळात होणारे मणक्यांचे आजार ( लंबर कॅनॉल स्टीनोसिस), हाडांच्या ठिसूळतेमुळे होणारे मणक्याचे फ्रॅक्चर या सर्वात रुग्णाला होणारा अतोनात त्रास होतो, तसेच अंथरुणावर दीर्घकाळ राहावे लागते. अंथरुणावर जास्त काळ राहिल्याने होणारे बेडसोर, वेगवेगळे इन्फेक्शन या सर्वांमुळे आयुष्य सुद्धा कमी होते. या सर्व कारणांमुळे गरज वाटल्यास शस्त्रक्रिया करावी लागते आणि ती शस्त्रक्रिया यशस्वीरित्या झाल्यास ते वेदना मुक्त व स्वतंत्र सुरक्षित जीवन जगू शकतात.

## कमलनयन बजाज हॉस्पिटल,
## वार्धक्य शास्त्र विभाग



## सुधारित आरोग्य सेवा आणि वाढत्या आयुर्मानामुळे वृद्धांची लोकसंख्या वाढत आहे.

**डॉ . महेश पाटील**
जेरियाट्रिक तज्ञ

- भारतामध्ये ६० वर्ष व त्यावरील वृध्दांना 'जेरियाट्रिक'(Geriatric) वय ग्रुप संबोधले जाते.
- वाढत्या वयानुसार वृध्दांमध्ये अनेक शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बदल होतात.
- वृध्द्त्वामुळे शरीराची कार्ये कमी होतात आणि वाढलेल्या कमकुवतेमुळे रोग प्रतिकारशक्ती तरुणांच्या तुलनेत कमी असते, तसेच पूर्वी घेतलेल्या लसीकरणाच्या परिणाम कमी होतो, त्यामुळे वृध्दांना संसर्ग होण्याचा धोका अधिक असतो.
- वृध्द लोकांमध्ये वैद्यकीय गरजा प्रौढांपेक्षा खूप वेगळ्या असतात.
- वृध्दत्वामुळे वृध्दांमध्ये सामान्य आजाराचे असामान्य सादरीकरण होऊ शकते. अनेक रोगांची लक्षणे जेष्ठांमध्ये वेगळी असू शकतात ( उदा . न्यूमोनिया च्या रुग्णांना ताप किंवा खोकला ही लक्षणे न दिसता ते फक्त गोंधळलेले असू शकतात.)
- वृध्द् लोकांमध्ये जुनाट आजार (मधुमेह, हृदयरोग, दमा, पॅरालिसिस , उच्चरक्तदाब, पार्किन्सन, थायरॉईड,किडनीचे आजार ) व्यतिरिक्त काही विशिष्ट आजार आहेत जे कोणत्याही श्रेणीमध्ये बसत नाही, त्यांना जेरियाट्रिक सिड्रोम/जायंट म्हणून उळखले जाते ( उदा – स्मृतीभ्रंश (Dementia), प्रत्यय (Fraility), लघवीवर नियंत्रण न राहणे (urinary incontinence), नैराश्य, हाडांचा ढिसूळपणा (osteoporosis) झोपेच्या समस्या (sleep disorder) , पडण्याची शक्यता (Falls) , बिछान्यात पडलेल्या रुग्णांना होणाऱ्या जखमा, कुपोषण चक्कर येणे , पोट साफ न होणे किंवा शौचावर नियंत्रण नसणे आणि वयोवृध्द् रुग्णांना बरीच औषधे चालू असतात. त्यांचे व्यवस्थित नियमन करणे आवश्यक असते.
- तरुण रुग्णांमध्ये नियमितपणे वापरल्या जाणाऱ्या काही औषधांचा वृध्द्त्वकाळामध्ये घातक परिणाम होऊ शकतो. अशी औषधे टाळणे आवश्यक असते किंवा वृद्धापकाळा मध्ये डोस वापरताना समायोजन आवश्यक आहे.
- जेरियाट्रिक मेडिसिन ही शाखा वृध्द लोकांमधील आजार आणि त्यावरील प्रतिबंधात्मक,उपचारात्मक आणि सामाजिक पैलूंशी संबधित आहे.
- हे सर्वांगीण दृष्टिकोन वापरून त्यांची कार्यक्षमता, शारीरिक, आरोग्य, आकलनशक्ती आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करते.
- जेरियाट्रिक मेडिसिन विभागाद्वारे वृध्द रुग्णांचे उपाययोजना करण्यापूर्वी त्यांच्या वैद्यकीय, सामाजिक, भावनिक आणि इतर गरजा विचारात घेतल्या जातात.
- वृद्धांची कार्यक्षमता अबाधित राखण्यासाठी प्रयत्न केले जातात.
- प्रत्येक वृध्द रुग्णांच्या गरजेनुसार सर्वसमावेशक पुरावा आधारित उपचार व उपाययोजनेला महत्व दिले जाते. ज्यामुळे काळजीवाहू आणि कुटुंबातील सदस्यांना आरामाची भावना मिळते.
- वृद्धांचे काळजी घेणारे जेरियाट्रिशियन , इतर सुपरस्पेशियालिटी डॉक्टर , फिजिओथेरपीस्ट, भाषण व श्रवण व्यावसायिक थेरपिस्ट पोषण तज्ञ आणि कुटुंबातील सदस्यांसोबत काम करतात जेणेकरून अनेक गरजा असलेल्या वृध्द रुग्णांना सर्वसमावेशक काळजी प्रदान करता येते.
- वृध्द रुग्णांचे सर्वसमावेशक मुल्यांकन करून केवळ शारीरिक आरोग्यच नव्हे, तर त्यांचे मानसिक , सामाजिक आणि कार्यात्मक आरोग्य सुधारून त्यांचा जीवनाची एकूण गुणवत्ता आणि दर्जा वाढवणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे.

# Kamalnayan Bajaj Hospital
(NABH मान्यताप्राप्त)

## एक परिपुर्ण रुग्णालय
मराठवाड्यातील जनतेप्रति
**समर्पित**



3 दशकांहून अधिक समर्पित सेवा




**मराठवाड्यात सर्व प्रथम**
पुढील सुविधा आणणारे रुग्णालय

- कॅथ लॅब • कर्करोग किरणोपचार (रेडिएशन) • लेसिक शस्त्रक्रिया • टेली-आयसीयू • बोन मॅरो ट्रान्सप्लांट
- न्युक्लिअर मेडीसिन (पेट सीटी, गॅमा कॅमेरा) • अद्ययावत दा विंची रोबोटिक शस्त्रक्रिया

### अद्ययावत दा विंची रोबोटिक शस्त्रक्रिया
- कर्करोग • मूत्रविकार • किडनी • स्त्रीरोग

### अस्थिरोग व सांधे प्रत्यारोपण
- गुडघा आणि खुबा प्रत्यारोपण (Knee & Hip Replacement)
- मणक्यांच्या शस्त्रक्रिया • आर्थ्रोस्कोपी आणि पॉलीट्रॉमा व्यवस्थापन

### परिपुर्ण कर्करोग सुविधा (कॅन्सर)
- मेडिकल ऑन्कोलॉजी (केमोथेरपी) • सर्जिकल ऑन्कोलॉजी
- रेडिएशन ऑन्कोलॉजी (IMRT/IGRT/VMAT)

### बालरोग सुपर स्पेशालिटी सुविधा
- हृदयरोग • हृदय शस्त्रक्रिया • किडनी विकार
- पोटांचे तसेच आतड्यांचे विकार • PICU (बालरोग अतीव दक्षता विभाग)
- NICU (नवजात शिशू अतिव दक्षता विभाग)

### सर्व रोग निदान सुविधा
- अद्ययावत 3 टेस्ला फिलिप्स इंजेनिया एमआरआय मशीन
- अद्ययावत सीमेन्स 384 स्लाइस ड्युअल सोर्स सीटी स्कॅन मशीन
- BMD (हाडांची ठिसुळता) • न्युक्लिअर मेडीसिन (पेट सीटी, गॅमा कॅमेरा)

**DAVINCI™**
**रोबोटिक शस्त्रक्रिया**













"सर्व सुपर **स्पेशालिटी सेवा** एकाच छताखाली उपलब्ध !"

- मराठवाड्यातील विश्वसनीय रुग्णालय • अद्ययावत वैद्यकीय तंत्रज्ञान आणण्यात अग्रेसर
- तज्ञ आणि अनुभवी डॉक्टर्स • सर्व सुपर स्पेशालिटी सेवा एकाच छताखाली उपलब्ध असलेले रुग्णालय